


दैनिक
अचूक वेध,अचूक बातमी
# अक्षराज
संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध

वर्ष : ०४, अंक : ८८
पाने : ०४, किंमत : ०३ रुपये
संपादक : विनोद कैलास गोरे
RNI NO. : MAHMAR/2022/82056
Follow Us On : www.aksharaj.com
Email : newsaksharaj2021@gmail.com

बुलडाणा, रविवार, दि.१० नोव्हेंबर २०२४


## महाविकास आघाडीचा जाहीरनामा ही पंचसूत्री नसून थापासुत्री...

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.०९, पुणे :** लाडकी बहीण योजनेला नावे ठेवणारे, बहिणींना भीक देणारे सरकार अशी योजनेची हेटाळणी करणा-या महाविकास आघाडीने योजनेची वाढती लोकप्रियता लक्षात आल्यानंतर या योजनेचा जाहीरनाम्यात समावेश केला आहे. विरोधकांची ही योजना चोर महाआघाडी आहे, अशी टीका राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी येथे शुक्रवारी केली. महाविकास आघाडीचा जाहीरनामा ही पंचसूत्री नसून थापासुत्री आहे,असेही शिंदे म्हणाले.

महायुतीच्या उमेदवार सिद्धार्थ शिरोळे, कसब्याचे उमेदवार हेमंत रासने, कोथरूडचे उमेदवार चंद्रकांत पाटील यांच्या प्रचारार्थ गोखलेनगर येथे एकनाथ शिंदे यांची जाहीर सभा झाली. त्यावेळी ते बोलत होते. महाविकास आघाडीने अडीच वर्षांत प्रकल्प, योजनांना स्थगिती दिली. त्यामुळे महाविकास आघाडीची विकास विरोधी सरकार म्हणून नोंद होईल. सत्तेच्या अडीच वर्षांच्या कालावधीत काय केले हे सांगण्यासाठी महाविकास आघाडीकडे काहीच नाही. त्यांनी काय केले हे समोर येऊन सांगावे असे आव्हानही शिंदे यांनी दिले.

'लाडकी बहिण भाऊ, भावांबरोबरच शेतकरी, ज्येष्ठ नागरिक, अंगणवाडी, आशा सेविका अशा सर्व घटकांसाठी मंत्रिमंडळाच्या पहिल्या बैठकीपासून जनहिताचे निर्णय म हायुतीने घेतले. अनेक योजनांचा निधी वाढविला. महायुतीच्या जाहीरनाम्याचा नवा दहा कलमी कार्यक्रम जाहीर केला. लाडकी बहीण योजना लोकप्रिय होण्यास सुरूवात झाल्यानंतर योजनेला बदनाम करण्याचा प्रयत्न सावत्र भावांकडून झाला. बहीणींना भीक देताय का, अशी हेटाळणी करण्यात आली.



सत्तेत आल्यानंतर योजनेची चौकशी केली जाईल. दोषींना तुरूंगात टाकले जाईल, असेही सांगितले. मात्र, एकनाथ शिंदे असल्या पोकळ धमक्यांना घाबरत नाही. लाडक्या बहीण भावासाठी शंभर वेळा तुरूंगात जाण्यासाठी तयारी आहे. मात्र, बहीणी सुज्ञ आहेत', असे शिंदे यांनी स्पष्ट केले.

ते म्हणाले की, महायुतीचे सरकार देणारे आहे. घेणारे नाही. रेवड्यांचे सरकार अशी टीक सरकारवर झाली. मात्र, महायुतीच्या योजना महाविकास आघाडीने चोरल्या आणि त्याच समावेश जाहीरनाम्यात केला. तीन हजार रूपये देतो अशी घोषणा केली. कर्नाटक, हिमचल प्रदेश, राजस्थान सारख्या राज्यात काय झाले हे सर्वांनी पाहिले आहे. आता ते केंद्र सरकारकडे बोट दाखवित आहेत. केंद्रात आणि राज्यात एकाच विचाराचे सरकार असल्यावर काय चम त्कार होतात हे सर्वांनी अडीच वर्षात पाहिले आहे. आता निवडणकीच्या कालावधीत खोटे राजकीय कथानक ( फेक नरेटिव्ह) पसरविण्याचा प्रयत्न केला जाईल. जाती जातीत तेढ निम त्र करण्याचे, विद्वेष पसरवून राजकीय पोळी भाजली जाईल. त्यामुळे जागरूक राहून महाविकास आघाडीचे मनसुबे उधळून लावायचे आहेत.

## निष्ठावान शिवसैनिक उपद्व्याप करत नाही - खा. निलेश लंके

### खा.नीलेश लंके यांचा संदेश कार्ले यांच्यावर हल्लाबोल !

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.९, अहिल्यानगर :** निष्ठावान शिवसैनिक उपद्व्याप करत नाहीत. तुम्ही शिवसेनेचे निष्ठावान म्हणता दुसरीकडे भाजपाचे टेंडर भरता मग तुम्ही कसले निष्ठावान शिवसैनिक ? उध्दव ठाकरे यांना अपमानास्पद पध्दतीने वर्षा बंगल्याबाहेर काढले त्याचा बदला घेण्याची वेळ आलेली असताना तुम्ही बंडखोरी करता असे सांगत खा. नीलेश लंके यांनी शिवसेनेचे बंडखोर उमेदवार संदेश कार्ले यांचे नाव न घेत हल्लाबोल केला. यावेळी बोलताना खा. लंके पुढे म्हणाले, शिवसेनेची व्याख्या मला सांगू नका.

माझ्या हातात आजही शिवबंधन आहे. स्वाभिम ानी मतदार बंडखोरी खपवून घेणार नाही. हे ठराविक गावांत फिरतात. लोक बुक्क्याच्या गाडीत नव्हे तर गुलालाच्या गाडीत बसतात. आमच्या व्यासपीठावर निष्ठावान लोक असल्याचे लंके यांनी सांगितले. लंके पुढे म्हणाले, ही निवडणूक राज्याच्या हिताची आहे. राज्यात महाविकास आघाडीचे सरकार राज्यात येणार ही काळ्या दगडावरची पांढरी रेघ आहे. आपला उमेदवार विजयी होणारच आहे. फक्त मताधिक्क्याचा प्रश्न शिल्लक



असल्याचे सांगत ही निवडणूक फार पुढे निघून गेल्याचे लंके म्हणाले. मेळाव्याच्या अध्यक्षस्थानी प्रा.शशिकांत गाडे हे होते. यावेळी माधवराव लामखडे, प्रताप शेळके, बाळासाहेब हराळ, संपत म्हस्के, बाबासाहेब गुंजाळ, घनश्याम म्हस्के, बाळासाहेब कोतकर, संजय जपकर, आबासाहेब कर्डिले, शिवा होळकर, पोपट खामकर, एकनाथ झावरे, साहेबराव बोडखे, अजय लामखडे, विद्या भोर, बाळासाहेब गायकवाड, केतन लामखडे, गंगाधर रोहकले, वसंत पवार, अशोक शिंदे, मंजाबापू निमसे,व्ही.डी. काळे, अशोक धनवटे, शंकर साठे, छबु महांडुळे, तुकाराम कातोरे, आदींची मोठ्या संख्येने प्रमुख उपस्थिती होती.

**बुडत्या जहाजात बसायला कोणी तयार नाही**

२४ तास ३६५ दिवस आम्ही झटतो आहोत, म्हणून जनता आमच्या सोबत आहे. आज निवडणूका आल्या म्हणून भुछत्रासारखे ते उगवले आहेत. महायुतीच्या उम ेदवारासोबत अनेक जण आपल्यासोबत येण्यासाठी फोन करत आहेत. काहींनी विरोधी उमेदवाराला घोड्यावर बसविले. उमेदवारी मिळवून दिली,तेच आता इकडे येण्यासाठी धडपड करत आहेत. कारण बुडत्या जहाजात बसण्यासाठी कोणी तयार नसल्याचे लंके म्हणाले.

**प्रवरेचे टेंडर !**

म्हशीच्या शिंगात डोकं घालण्यासाठी पैसा मिळत असेल तर डोके घालायला अडचण काय? हे प्रवरेचे टेंडर आहे. तुम्ही काय शिवसेनेच्या निष्ठा सांगता ? स्वतः ला स्थानिक म्हणता मग आम्ही पाकीस्तानी आहोत का? चार गावचे तुम्ही टेंडर घेतले काय ? तुमचे नगर तालुक्यात बुथ लागणार नाही. मी डोक्यात घेतले तर ग्रामपंचायत सदस्य होऊ देणार नसल्याचा इशारा खा. निलेश लंके म्हणाले.

## बाजारात कांदा, लसणाचा तुटवडा ? कांदा, लसणाच्या दरातील तेजी किती दिवस ?

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.०९, मुंबई :** बाजारात कांदा आणि लसणाचा तुटवडा निर्माण झाल्यामुळे कांदा ८० रुपये किलोवर तर लसूण ४०० रुपये किलोवर गेला आहे. कृषी उत्पन्न बाजार समित्यांम ध्ये कांदा आणि लसणाची आवक कमी झाल्यामुळे तुटवडा जाणवत आहे. पुढील महिनाभर कांद्याचे आणि तीन – चार महिने लसणाचे वाढ चढेच राहणार आहेत.



दिवाळीनिमित्त नाशिक परिसरात कांद्याची खरेदी – विक्री आठवडाभर बंद होती. त्यामुळे बाजारांत कांद्यांचा तुटवडा निर्माण झाला आहे. शेतकऱ्यांकडील उन्हाळी कांदा जवळपास संपला आहे.

किरकोळ प्रमाणात दोन ते पाच टक्के उन्हाळी कांदा शेतकऱ्यांकडे शिल्लक आहे. खरीप कांद्याची काढणी सुरु असतानाच जोरदार पाऊस झाल्यामुळे कांदा सडला आहे. त्यामुळे खरीप कांद्याच्या उत्पादनात मोठी घट झाली आहे. खरीप कांद्याची नुकतीच आवक सुरू झाली आहे. बाजारात कांद्याचा तुटवडा असतानाच बांगलादेशाने कांद्यावर लागू केलेला ५० टक्के आयात शुल्क १५ जानेवारीपर्यंत शून्य टक्के केला आहे. त्यामुळे बांगलादेशाला अचानक निर्यात वाढली आहे. या सर्वाचा परिणाम म्हणून पुणे, मुंबईसह राजधानी दिल्लीत दर्जेदार कांद्याचे दर ८० रुपयांवर गेले आहेत.

खरीप हंगामातील नुकताच काढलेला, पाण्याचे प्रमाण जास्त असलेला कांदा ६० रुपये किलो दराने विक्री होत आहे. मुंबईत किरकोळ बाजारात कांदा ६० ते ८० रुपये किलो दराने विक्री होत आहे. खरीप कांद्याची काढणी सुरू झाली आहे. कांदा हळूहळू बाजारात येऊ लागला आहे. दिवाळीनंतर अद्यापही कृषी उत्पन्न बाजार समि तीतील खरेदी – विक्री सुरळित झालेली नाही. त्यामुळे पुढील महिनाभर कांद्याच्या दरात तेजी राहणार आहे. खरिपातील कांद्याची बाजारात आवक सुरू झाल्यानंतर कांद्याच्या दरात काहीसा दिलासा मिळू शकेल, अशी माहिती विंचूर येथील कांद्याचे व्यापारी अतिश बोराटे यांनी दिली.

**तीन महिने लसूण तेजीत राहणार**

किरकोळ बाजारात लसणाचे दर ४०० ते ४५० रुपये किलोंवर गेले आहेत. लसणाचा हंगाम अखेरच्या टप्प्यात असल्यामुळे बाजारात तुटवडा निर्माण झाला आहे. लसणाची रब्बी हंगामात लागवड केली जाते. गुजरात, मध्य प्रदेश, उत्तर प्रदेश आणि महाराष्ट्रात लसणाचे उत्पादन होते. रब्बी हंगाम ातील लसणाची लागवड आता सुरू झाली आहे. या लसणाची काढणी फेब्रुवारीपासून सुरू होईल. त्यामुळे पुढील तीन – चार महिने लसणाचे दर तेजीत राहणार आहेत.

**राज्याबाहेरून येणारी आवक घटली**

बाजारात कांदा आणि लसणाचा तुटवडा आहे. शेतकऱ्यांकडील उन्हाळी कांदा आणि लसूण संपला आहे. खरीप हंगामातील कांद्याची आवक सुरू झाली आहे. त्यामुळे पुढील महिनाभर कांद्याचे दर तेजीत राहतील. राज्याबाहेरून होणारी लसणाची आवक थंडावली आहे. रब्बी हंगामातील नवीन लसूण बाजारात येईपर्यंत लसणाचे दर आवाक्यात येणार नाहीत, अशी माहिती पुणे बाजार समितीतील अडते असोसिएशनचे माजी अध्यक्ष विलास भुजबळ यांनी दिली.

## सोशल मीडियावर सायबर पोलिसांचा 'वॉच'

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.९, अहिल्यानगर :** विधानसभा निवडणुकीच्या अनुषंगाने सायबर पोलिसांकडून सोशल मीडियावर 'वॉच' ठेवला जात आहे. कुठल्याही व्हॉट्सॲप ग्रुपमध्ये आचारसंहितेचा भंग होईल अथवा दोन गटात वाद होईल अशी पोस्ट अथवा मजकुर, फोटो, व्हीडीओ टाकल्याचे निदर्शनास आल्यास त्याला संबंधित व्यक्तीसह ग्रुप ॲडमीन जबाबदार असणार आहे. त्या करीता ॲडमीन यांनी आपल्या ॲपची सेटिंग चेंज करून 'ओनली फॉर ॲडमीन' अशी करून घ्यावी, असे आवाहन सायबर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक मोरेश्वर पेंदाम यांनी केले आहे. दरम्यान, त्यांनी तशी नोटीस जारी केली आहे. आदर्श आचारसंहिता भंग झाल्यास आपणास जबाबदार धरण्यात येऊन आपल्याविरूध्द कडक कायदेशीर कारवाई करण्यात येईल. सदरची नोटीस आपल्या विरूध्द न्यायालयात पुरावा म्हणून सादर करण्यात येईल असेही त्यांनी म्हटले आहे. मतदान प्रकिया व प्रचारादरम्यान कोणतेही गैरकृत्य करण्यापासून परावृत्त होणेकरिता पोलिसांनी ही नोटीस जारी केली आहे. कोणत्याही उमेदवाराशी संबंधित त्यांचे वैयक्तीक कौटुंबिक अगर सामाजिक स्तरावर अवहेलना होईल असे आक्षेपार्ह टिकाटिप्पणी करणे, मजकूर, फोटो, व्हिडीओ करून प्रसारित करणे अथवा आलेल्या संदेशावर आपले आक्षेपार्ह मत प्रकट करणे व पुढे पाठविणे, मतदाराचे मन वळवण्यासाठी कोणत्याही धर्माच्या लोकांच्या धार्मिक, भाषिक तसेच जातीत व्देष पसरविणारे आक्षेपार्ह मजकुर फोटो, व्हिडीओ करून प्रसारित करणे, निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राष्ट्रीय एकात्मतेला बाधा निर्माण होईल अशा प्रकारचे स्वातंत्र्य सोशल मीडिया ग्रुप निर्माण करून त्याव्दारे आक्षेपार्ह मजकूर फोटो, व्हिडीओ, करून प्रसारित करणे अथवा कृत्य करणे, कुठल्याही व्हॉट्सॲप ग्रुपमध्ये आचारसंहितेचा भंग होईल अथवा दोन गटांत वाद होईल अशी पोस्ट अथवा मजकूर, फोटो, व्हिडिओ टाकल्याचे निर्दशनास आल्यास संबंधित व्यक्तीसह ग्रुप ऍडमिन जबाबदार असणार आहे,असे नोटीस मध्ये नमूद केले आहे.

## सह्याद्रीच्या पट्ट्यात घोटगेवाडी येथे दुर्मिळ उडता सोनसर्प आढळला

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.०९, सावंतवाडी :** सिंधुदुर्ग जिल्ह्यातील दोडामार्ग तालुक्यात घोटगेवाडी येथे दुर्मिळ असलेला उडता सोनसर्प आढळून आला आहे. या गावात पुन्हा एकदा सोनसर्प आढळून आल्याने परिपूर्ण जैवविविधतेने हा भूभाग व्यापला आहे असे पर्यावरण प्रेमींनी म्हटले आहे. घोटगेवाडी येथील शेतकरी सखाराम नारायण सुतार यांच्या घरालगत शुक्रवारी सायंकाळी हा साप दिसून आला. नेहमी आढळणाऱ्या प्रजातीं व्यतिरिक्त नवीन प्रजातीचा साप असल्याचे उघडकीस आले. या सापाला सर्पमित्र लाडू गवस यांनी पकडून नैसर्गिक अधिवासात सोडले. अशा प्रकारचा साप गतवर्षी जूनमध्ये तेथील दत्त मंदिराच्या परिसरातील पिंपळाच्या झाडाखाली आढळून आला होता. या सापाला शेलाटी तथा उडता सोनसर्प तथा इंग्रजीत ऑरनेट फ्लाईंग स्नेक (शास्त्रीय नाव – क्रिसोपेलिया ऑर्नाटा) म्हणतात. हा दक्षिण आणि आग्नेय आशियात आढळणारा साप आहे. सहसा झाडांवर राहणारा हा सर्प फांद्यांतून लांब उड्डाणवजा उड्या मारू शकतो. माणसाला हानिकारक होईल इतका विषारी समजला जात नाही. हिरवट पिवळा ज्यावर काळे पट्टे आणि सुंदर नक्षी असलेला हा साप महाराष्ट्रातील गडचिरोली, चंद्रपूर आणि आंबोली घाटात काही प्रमाणात आढळून येतो. या सापाची लांबी ही सुमारे २.५ ते ४ फूट असून तो निमविषारी प्रवर्गातील असल्याचे जाणकारांचे मत आहे.



## अडीच वर्षांच्या मुलीवर बलात्कार करून हत्या




**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.०९, मुंबई :** सावत्र वडिलांनी अडीच वर्षांच्या मुलीवर बलात्कार करून तिची हत्या केल्याची धक्कादायक घटना गुरुवारी मानखुर्द परिसरात घडली आहे. याबाबत मानखुर्द पोलिसांनी हत्या आणि बलात्काराचा गुन्हा दाखल करत आरोपीला अटक केली असून पोलीस त्याच्याकडे याबाबत अधिक तपास करत आहेत.

मानखुर्दच्या अण्णाभाऊ साठे नगर परिसरात मयत मुलगी आई आणि सावत्र वडिलांसोबत राहात होती. गुरुवारी रात्री तिची आई घरकाम करण्यासाठी बाहेर गेली होती. त्याच वेळी आरोपीने या मुलीवर बलात्कार केला. मुलीची आई घरी परतल्यानंतर तिच्या ही बाब लक्षात येताच तिने तत्काळ मानखुर्द पोलीस ठाण्यात धाव घेतली. त्यानुसार पोलिसांनी हत्या आणि बलात्काराचा गुन्हा दाखल करत आरोपीला अटक केली आहे.

अक्षराज



# संपादकीय

## नेपाळची नवी कुरापत

नेपाळ हा भारताचा सख्खा शेजारी देश. जगातील एकमेव हिंदू धर्मीय देश. भारत हा देखील हिंदू संस्कृतीचा पाईक त्यामुळे दोन्ही देशातील चालीरीती, संस्कृती, सण, उत्सव, परंपरा सारखीच त्यामुळे नेपाळ हा भारताचा शेजारी आसला तरी भारताने त्याला कायम छोट्या भावा सारखीच वागणूक दिली आहे. नेपाळवर ज्या ज्या वेळी संकटे आली त्या त्या वेळी भारतच धावून गेला त्यामुळे गेल्या अनेक शतकांपासून भारत आणि नेपाळचे संबंध मैत्रीपूर्ण आणि सौहार्दाचे राहिले आहेत मात्र या संबंधांना मागील काही वर्षात तडा गेला आहे. भारत नेपाळ संबंधातील सौहार्दात कटुता निर्माण होऊन दोन्ही देशात तणावपूर्ण परिस्थिती निर्माण झाली आहे. हा तणाव कमी करून दोन्ही देशात पूर्वी प्रमाणे मैत्रीचे संबंध प्रस्थापित करण्याचा प्रयत्न भारताकडून होत असताना नेपाळ मात्र काही तरी कुरापती काढून दोन्ही देशातील तणाव कायम ठेवत आहे. नेपाळने अशीच एक नवी कुरापत काढून दोन्ही देशातील तणाव पुन्हा वाढवला आहे. नेपाळने १०० रुपयांची नोट पुन्हा डिझाईन करण्याचा निर्णय घेतला आहे. या नोटा छापण्याचे कंत्राट त्यांनी चीनमधील एका कंपनीला दिले. अर्थात तो त्यांचा अधिकार आहे. नोटा बदलण्याचा, त्याची डिझाईन बदलण्याचा, आणि त्याची छपाई कोठून करायची याचा सर्वस्व अधिकार नेपाळचा असल्याने भारताने त्यावर आक्षेप घेण्याचे कारण नाही भारताने यावर आक्षेप घेतला नाही मात्र ज्यावेळी ही नोट छापून चलनात आली त्यावेळी मात्र भारताने त्यावर आक्षेप घेतला कारण या नव्या नोटेवर नेपाळने त्यांचा नवा सुधारित नकाशा छापला असून त्या नकाशात लीपुलेख, लिम्पियाधूरा आणि कालापाणी हे भूभाग नेपाळमध्ये दाखवले आहेत. वास्तविक भारत - नेपाळ सीमेवरील हे भूभाग भारतीय सीमेत आहे मात्र नेपाळ त्यावर दावा करत आहे. खूप वर्षापासून हा वाद चालू असल्याने दोन्ही देशात यावरून अनेकदा तणाव निर्माण झाला. हा वादग्रस्त भाग असल्याने नेपाळने त्यावर दावा करू नये असे भारताचे म्हणणे आहे. तरीही नेपाळ हा विषय ऐन केन प्रकरणाने उकरून काढत आहे. नेपाळ भारताच्या सातत्याने कुरापती काढत आहे कारण त्याला चीनची फुस आहे. मागील काही वर्षापासून नेपाळ हा चीनच्या नादी लागला आहे. चीनने नेपाळला कर्ज देऊन नेपाळला आपल्या अंकित केले आहे. नेपाळचे सध्याचे सरकार हे चीन धार्जिणे आहे. चीन सांगेल तेच ते करत आहे एकाअर्थी नेपाळमधील विद्यमान सरकार हे चीनच्या हातचे बाहुले आहे त्यामुळेच चीन सांगेल त्याप्रमाणे नेपाळचे सरकार वागत आहे. भारतानेही नेपाळला वेळोवेळी त्यांची चूक दाखवून खडसावले आहे आताही भारताचे परराष्ट्रमंत्री एस जयशंकर यांनी भारताची बाजू स्पष्ट करतांना म्हंटले की नेपाळशही आम्ही आमच्या सीमा प्रकरणांवर एका प्रस्थापित मंचाद्वरे चर्चा करीत आहोत. दरम्यान त्यांच्या बाजूने त्यांनी काही एकतर्फी पावले उचलली आहेत, परंतु त्यांच्याकडून काहीही करून आमच्यातील परिस्थिती किंवा वास्तविकता बदलता येणार नाही.

**काय आहे सीमा वाद ?**

१८१६ मधील अँग्लो - नेपाळ युद्धानंतर नेपाळ आणि ब्रिटिश शासित भारत यांच्यात सुगौलीचा करार झाला. हा करार झाल्यापासून भारत आणि नेपाळ यांच्यात सीमावाद सुरू झाला. या करारा नुसार काली नदीला नेपाळची नैसर्गिक पश्चिम सीमा म्हणून निश्चित करण्यात आली. काली नदीचा पूर्वेकडच्या भागात लिपुलेख, लिम्पियाधुरा आणि कालापानी हा भाग आहे. १९६० पासून हा भाग भारतीय प्रशासनाच्या नियंत्रणाखाली आहे. २०१९ साली नेपाळने या भूभागावर हक्क सांगितल्यावर भारताने त्यावर हरकत घेतली. त्यानंतर २०२० साली नेपाळने आपल्या नकाशात हा भूभाग दाखवला तेंव्हापासून दोन्ही देशात तणाव निर्माण झाला. भारताकडून हा तणाव कमी करण्याचा सातत्याने प्रयत्न होत असताना नेपाळ मात्र चीनच्या नादी लागून सतत भारताच्या कुरापती काढत आहे. आताही चलनी नोटेवर हा भूभाग दाखवून नेपाळने भारताची कुरापत काढून दोन्ही देशातील तणाव आणखी वाढवला आहे.

# मुलांनो मैदानात या...

आजचे युग हे विज्ञान तंत्रज्ञानाचे युग समजले जाते. २१ व्या शतकातील या विज्ञान तंत्रज्ञानाच्या युगात स्मार्ट फोन, इंटरनेट हे प्रत्येकाच्या जीवनातील अविभाज्य घटक बनले आहेत. केवळ घरातील मोठ्या माणसंकडेच नव्हे तर शाळकरी मुलांकडे देखील मोबाईल फोन पाहायला मिळत आहे.

कोरोना काळात ऑनलाइन शिक्षणासाठी पालकांनी घेऊन दिलेला मोबाईल अजूनही मुलांच्या हातात आहे. हाच मोबाईल आज मुलांचा सर्वात जवळचा सहकारी बनला आहे. सकाळी उठल्यापासून रात्री झोपेपर्यंत मुले मोबाईललाच चिकटून बसलेली असतात. आजच्या विज्ञान तंत्रज्ञान युगात मोबाईल हा गरजेचा आहे. तो गरजेपुरातच वापरला गेला पाहिजे मात्र आज मुलांसाठी मोबाईल हेच सर्वस्व होऊन बसले आहे. आजच्या मुलांना मोबाईलने भुरळ घातली आहे. दिवसातील पाच ते दहा तास मुले मोबाईल वरच असल्याने मुलांची शारीरिक व बौद्धिक वाढ खुंटत चालली आहे त्यामुळे मुलांचे बालपण हरवत चालले की काय अशी शंका मनात येते. आजची मुले जास्त प्रमाणात टीव्ही, संगणक,



मोबाईल, इंटरनेट, व्हिडीओ गेम, व्हाट्सएप, फेसबुक, इंस्टाग्राम यासारख्या सोशल मीडियात दंग असतात. तंत्रज्ञानरुपी राक्षसानं मुलांचं बालपणच खाऊन टाकलंय. पूर्वी शाळांना सुट्ट्या लागल्या की गावागावातील मैदाने मुलांनी भरून गेलेली असायची पण आज ती मैदाने विज्ञान तंत्रज्ञानाच्या युगात ओस पडली असल्याचे चित्र पाहायला मिळते. क्रिकेट वगळता एकही मैदानी खेळ खेळताना मुले दिसत नाहीत. देशी खेळ तर आजच्या मुलांना माहीतच नाहीत. गोट्या भोवरे विटीदांडू खेळताना कोणी दिसत नाही. आट्यापाट्या आणि सुरपारंब्या या खेळाचे नियम तर सोडाच पण नावही आजच्या मुलांना माहीत नाही. मोठे रिंगण घेऊन त्यात गोट्यांचा डाव लावल्याचे चित्र आज पाहायला मिळत नाही.

गलगुट करून खेळणे व त्यावर राज्य द्यावे लागल्याचे हल्लीच्या मुलांमध्ये ऐकिवातही नाही. भोवऱ्याच्या रिंगणाचीही तीच अवस्था. दगडावर आरी घासून भोवऱ्याला टोक करीत बसलेला मुलगा शोधूनही सापडेनासा झाला आहे. जुन्या कपड्यांचा चेंडू तयार करून खेळला जाणारा रप्पाधप्पीचा खेळ हल्लीच्या मुलांना माहीतही नाही. लपंडाव, विटीदांडू,, लगोरी, कुरघोडी, चंपूल, उडाणटप्पू हे खेळ आता दुर्मिळ झाले आहेत. लंगडी हा खेळ आता फक्त शाळेतील पिटी च्या तासापूरता उरला आहे.

या खेळांमुळे मुलांचा शारीरिक व्यायाम व्हायचा शिवाय संघभावना, एकी, आपुलकी, नेतृत्व हे गुण या खेळांमुळे मुलांमध्ये विकसित व्हायचे. या खेळाची जागा आता टीव्ही, संगणक, मोबाईल व्हिडीओ गेम यांनी घेतली आहे. टीव्ही, संगणक, व्हिडीओ गेममुळे मुलांना विविध खेळांची माहिती उपलब्ध होऊन त्यातून मुलांचा बौद्धिक विकास होतो असे वाटत असले तरी त्यांचा शारीरिक विकास खुंटत चालला आहे याचा समाजातील सर्व घटकांनी गांभीर्याने विचार करण्याची गरज आहे. मुलांना पुन्हा मैदानाकडे आणण्याची जबाबदारी पालक, शिक्षक व समाजातील सर्वच घटकांची आहे.

**- श्याम ठाणेदार**
**दौंड जिल्हा पुणे**
**९९२२५४६२९५**

# राहाता तालुक्याला गुलामगिरीतून मुक्त करणार – आ. बाळासाहेब थोरात

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.९, शिर्डी (आहिल्यानगर) :** राहाता तालुक्याला गुलामगिरीतून बाहेर पडण्याची ही मोठी संधी आहे. यावेळेस त्यांचा कार्यक्रम झालाच पाहिजे. मी या मतदारसंघाचा मतदार आहे. संगमनेरप्रमाणे शांतता सुव्यवस्था आणि वैभव प्राप्त करून देण्यासाठी आपण काम करत आहोत. बारा दिवस तुम्ही महाविकास आघाडीसाठी द्या.पुढील पाच वर्षे तुमची जबाबदारी आम्ही घेतो, असे प्रतिपादन माजी महसूलमंत्री आ. बाळासाहेब थोरात यांनी केले. शिर्डी येथील नगर परिषदेच्या प्रांगणात प्रभावती घोगरे यांच्या प्रचारार्थ आयोजित सभेत आ. थोरात बोलत होते. यावेळी खा. निलेश लंके, खा. भाऊसाहेब वाकचौरे, प्रभावती घोगरे, रिपाइं नेते बाळासाहेब गायकवाड, शिवसेनेचे सचिन कोते, सुहास वहाडणे, नानाभाऊ बावके, राष्ट्रवादीचे शशिकांत लोळगे, सखाराम चौधरी, काँग्रेसचे प्रवक्ते सुदर्शन कुमार रॉय, घन:श्याम शेलार, नारायण कार्ले, सचिन चौगुले, सुरेश थोरात, लताताई डांगे, श्रीकांत मापारी, मिलिंद कानवडे, नवनाथ आंधळे, अविनाश दंडवते, पंकज लोंढे, शितल लहारे, संजय शिंदे, सुधाकर शिंदे आदींसह महाविकास आघाडीचे विविध पदाधिकारी उपस्थित होते. आ. थोरात म्हणाले, साठ वर्षांत ज्यांना एमआयडीसी करता आली नाही. त्यांनी फक्त एमआयडीसीचे गाजर दाखवले आहे. प्लॉट कोणाला दिले याची चौकशी झाली पाहिजे. नगर-मनमाड रस्त्याने अनेकांचे जीव घेतले. रस्ता ज्यांना करता आलो नाही ते काय विकास करणार, असा सवाल करत महाविकास आघाडीचे सरकार आल्यानंतर ज्यांनी विनाकारण त्रास दिला, त्या सगळ्यांची दुरुस्ती करू, असा इशाराही त्यांनी दिला.




**शिर्डी येथे प्रभावती घोगरे यांच्या प्रचारार्थ सभेला नागरिकांची उच्चांकी गर्दी**

शिर्डीतून प्रभावती घोगरे जायंट किलर ठरणार खा. निलेश लंके म्हणाले, आ. बाळासाहेब थोरात हे राज्यातील सुसंस्कृत नेतृत्व आहे. संगमनेर तालुक्यात विकासाचा नवा मापदंड त्यांनी निर्माण केला आहे. संगमनेर आणि राहात्याची तुलना कधीच होऊ शकत नाही. तिकडे संस्कृती आहे तर इकडे दडपशाही आहे. या दडपशाहीतून मुक्तीसाठी नागरिकांनी मोठी संधी आहे. प्रभावती घोगरे शिर्डी मतदारसंघातून विधानसभेत जायंट किलर ठरतील.

## हकालपट्टी..

उभे राहिलो म्हणूनि
शिक्का मारला हट्टी
पक्षादेश धुडकावला
करतात हाकालपट्टी

आयुष्यभरराबलेलो
गळ्यांत गुलामपाटी
कितीदा केला त्याग
रे पक्षाच्या निष्ठेपोटी

असंतोष दूर साराया
रे तात्पुरतीमलमपट्टी
पुढल्या वेळी नक्की
आश्वासने देती खोटी

आमच्या चुकामोजा
भली मोठी फूट पट्टी
तुमचा दोष दाखवता
तोंडाला चिकटे पट्टी

खुर्ची राज पुत्रासाठी
कार्यकर्त्या देता सुट्टी
माघार घ्यायला लावे
देऊनि बोटभर चिठ्ठी

का मागता उमेदवारी
छान काढा खरडपट्टी
सत्तेत वाटा कशाला
रे होणारचं उखंडपट्टी

**- हेमंत मुसरीफ, पुणे**
**९७३०३०६९९६**

अक्षराज
अचूक वेध, अचूक बातमी

# राज्यात प्रथमच 'पूर्वपीठिका' फ्लिप-बुक तयार

**अक्षराज : जे. के. पोळ**

**दि.०९, ठाणे :** विधानसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ च्या अनुषंगाने जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक निर्णय अधिकारी अशोक शिनगारे यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हा माहिती कार्यालय, ठाणे मार्फत विधानसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ पूर्वपीठिका तयार करण्यात आली आहे. अशा प्रकारची पर्यावरणपूरक व नाविन्यपूर्ण फ्लिप-बुक स्वरूपात 'पूर्वपीठिका' ही पुस्तिका राज्यात प्रथमच तयार करण्यात आली आहे.

जिल्हाधिकारी कार्यालयातील समिती सभागृह येथे नुकतेच या डिजिटल पुस्तिकेचे प्रकाशन डिजिटल पद्धतीने जिल्हाधिकाऱ्यांच्या हस्ते संपन्न झाले.

पूर्वपीठिका या पुस्तिकेद्वारे जिल्ह्यातील प्रसार माध्यम प्रतिनिधी व सामान्य नागरिकांकरिता विधानसभा १९६२ ते २०१९ या कालावधीतील ठाणे जिल्ह्यातील विविध मतदारसंघातील उमेदवारनिहाय मतदानाची अंतिम आकडेवारी देण्यात आली आहे. या पुस्तिकेची निर्मिती करण्यासाठी कोकण विभागीय माहिती कार्यालयाचे उपसंचालक (माहिती) डॉ.गणेश मुळे यांनी मार्गदर्शन केले. तसेच जिल्हा माहिती अधिकारी मनोज शिवाजी सानप यांनी या पुस्तिकेचे मुख्य संपादक म्हणून काम पाहिले आहे. या पुस्तिकेसाठी ठाणे जिल्हा माहिती कार्यालय तथा एकत्रित माध्यम कक्षातील सर्व कर्मचाऱ्यांचे मोलाचे सहकार्य लाभले आहे.

ही पुस्तिका https://tinyurl.com/yhzac932 आणि https://tinyurl.com/42j6f7js या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

तरी जास्तीत जास्त प्रसारमाध्यम प्रतिनिधी व सामान्य नागरिकांनी या पुस्तिकेचे जरूर अवलोकन करावे, असे आवाहन ठाणे जिल्हा माहिती अधिकारी मनोज शिवाजी सानप यांनी केले आहे.

# हवा प्रदूषणात उरण देशात तिसऱ्या क्रमांकावर

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.०९,** उरण : गेल्या काही दिवसांपासून उरणच्या हवेची गुणवत्ता खालावू लागली असून गुरुवारी दुपारी हवा गुणवत्ता निर्देशांक ३०० पार गेल्याने प्रदूषणात उरण शहर देशात तिसऱ्या क्रमांकाचे शहर गणले गेले. परंतु, धूलिकणवाढ मानवी शरीरास घातक नसल्याचा दावा विभागीय प्रदूषण नियंत्रण मंडळाने केला आहे. उरणच्या हवेचा निर्देशांक ३१८ वर पोहोचला होता. गेल्या अनेक वर्षांपासून उरणच्या प्रदूषित हवेच्या मात्रेत सातत्याने वाढ होत आहे. त्यामुळे नागरिकांना सर्दी-खोकला आणि श्वसनाचाही त्रास होऊ लागला आहे. सध्या आर्द्रता वाढत असल्याने सकाळी प्रदूषके साचून राहतात. केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या निकषांनुसार, हवा गुणवत्ता निर्देशांकातील ०-५० म्हणजे चांगले, ५१-१०० समाधानकारक, १०१-२०० मध्यम, २०१-३०० वाईट, ३०१-४०० अत्यंत वाईट आणि ४०० पेक्षा जास्त म्हणजे अतिधोकादायक समजली जाते. उरण परिसरात सध्या सकाळी धुके पडत आहे. कमाल तापमान ३३ ते ३५ अंश सेल्सिअसच्या आसपास राहत आहे, तर किमान तापमान २० ते २७ अंश सेल्सिअसच्या आसपास आहे. पावसाळ्यानंतर वाऱ्यांची स्थिती बदलते, वेग मंदावतो. त्यामुळे हवेत साचलेली धूळ, प्रदूषके यांचा निचरा होत नाही. बाष्पामुळे धूलिकण हवेतच तरंगत राहतात. या नैसर्गिक कारणांबरोबरच अनेक मानवनिर्मित कारणेही प्रदूषणात भर घालत आहेत.

**धुळीमुळे हवा खराब...**

उरण तालुक्यातील राष्ट्रीय महामार्गांवरील अवजड वाहनांची वाढती संख्या तसेच व्यावसायिक संकुले, नवे प्रकल्प यांची बांधकामे मोठ्या प्रमाणावर सुरू आहेत. त्यातून उडणारी धूळ हवेचा दर्जा ढासळण्यास कारणीभूत ठरत असल्याचे निरीक्षण तज्ज्ञांकडून नोंदवण्यात येत आहे. वाहनांच्या धुरामध्ये अतिसूक्ष्म काजळीसारखे कण असतात. हे कण प्रदूषण वाढविण्यास कारणीभूत ठरतात.

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

# थोडक्यात

## विंचूर येथे भक्ती संगीत व आत्मसाक्षात्काराचा कार्यक्रम

**अक्षराज : सुनील क्षिरसागर**

**दि.०९, विंचूर (नाशिक) :** विंचूर येथील सहयाद्री प्रतिष्ठान व सहजयोग परिवार आयोजित प.पू. श्रीमाताजी निर्मलादेवी प्रणित सहजयोगाद्वारे आत्मसाक्षात्कार व अम रावतीचे दलाल बंधू डॉ. संदीप दलाल, प्रा. मिलिंद दलाल त्याचप्रमाणे नाशिकचे सुप्रसिद्ध गायक प्रा.आनंद अत्रे यांचा सुमधुर भक्ती संगीताचा कार्यक्रम सोमवार दि. ११ नोव्हेंबर रोजी रात्री ७:३० वाजता कर्मवीर भाऊराव पाटील विद्यालय विंचूर या ठिकाणी आयोजित केला असून, प.पू. श्रीमाताजी निर्मलादेवी प्रणित सहजयोग ही आत्मज्ञानाची एक सोपी पद्धत आहे. प्रत्येक मानवाच्या माकडहाडामध्ये ही कुंडलिनी शक्ती सुप्तावस्थेत व साडेतीन वेटोळे घालून बसलेली असते. सहजयोगाद्वारे ती जागृत होऊन साधकाचा सर्वव्यापी परमेश्वरी शक्ती बरोबर योग घटित होतो. यामुळे साधकाला स्वतःच्या टाळूवर किंवा तळ हातावर थंड चैतन्य लहरींची जाणीव होते व निर्विचार अवस्था प्राप्त होते. प.पू. श्री माताजी निर्मलादेवी यांच्या कृपा आशीर्वादाने आत्मसाक्षात्काराचे हे पवित्र ज्ञान मानव जातीसाठी सुलभ झाले आहे. संपूर्ण विश्वामधील १७० हून अधिक देशातील लोकांनी सहजयोगाद्वारे आत्मसाक्षात्कार प्राप्त करून आपले जीवन समृद्ध केलेले आहे. आपणही चैतन्य लहरींची तसेच परमशांतीची अनुभूती घेऊन आपले जीवन समृद्ध केले पाहिजे. सहजयोग ध्यानधारणा नियमित केल्यामुळे आरोग्यात सुधारणा होते. मानसिक ताण-तणावापासून मुक्तता मिळते. विद्यार्थ्यांमध्ये स्मरणशक्तीचा व एकाग्रतेचा विकास होऊन अभ्यासात प्रगती होते.सुख-शांती समाधान व निरानंदाची प्राप्ती होते. सहजयोग ध्यान पद्धत अत्यंत सोपी असून संसारी लोकांना आपली नोकरी व्यवसाय सांभाळून करता येते. चैतन्य लहरी द्वारे कृषी क्षेत्रात प्रगती होते. सहजयोगाचे संपूर्ण ज्ञान निःशुल्क प्रदान केले जाणार असून, या कार्यक्रमाला विंचूर व परिसरातील नागरिकांनी सहकुटुंब सहपरिवार उपस्थित राहण्याचे आवाहन नाशिक जिल्हा सहजयोग परिवार व सह्याद्री प्रतिष्ठान विंचूर यांच्या वतीने करण्यात आले आहे.

## महाराष्ट्र ग्रामीण बँक हाळी येथे अपुऱ्या कर्मचाऱ्यांमुळे ग्राहकांना त्रास

**अक्षराज : जयराम देमगुंडे**

**दि.०९, उदगीर (लातूर) :** उदगीर तालुक्यातील हाळी येथील महाराष्ट्र ग्रामीण बँकेत अपुऱ्या कर्मचाऱ्यांमुळे ग्राहकांना त्रास सोसावा लागत आहे. हाळी व हंडरगुळी हे लोकसंख्येच्या व व्यापारीच्या दृष्टीने मोठी पेठ आहे व येथील बैल बाजार हा चार राज्यात सुप्रसिद्ध आहे त्यामुळे परराज्यातून अनेक बैल व्यापारी येथे येतात.

तसेच अनेक खेडेपाड्यांचा ग्रामीण बँकेची संलग्न व्यवहार आहे सरकारी बँक नसल्यामुळे अनेक व्यवहार याच बँकेतून होतात. परंतु ग्रामीण बँकेत अपुऱ्या कर्मचाऱ्यांमुळे ग्राहकांना विनाकारण त्रास असावा लागत आहे.सध्या महाराष्ट्र ग्रामीण बँकेत बँक मॅनेजर व कॅशियर असे दोन कर्मचारी व सहाय्यक म्हणून एक सेवक आहे.सध्या लाडक्या बहिणीचे पण पैसे याच बँकेतून उचलण्यासाठी गर्दी पडलेली असते.

त्यामुळे महिला व पुरुषांसाठी एकच रांग केली आहे व प्रत्येक वेळेस कॅशियर कडून पैसे काढण्यासाठी व क्लिअरिंग साठी बँक मॅनेजरच्या सही साठी जावे लागते त्यामुळे ग्राहक परत नंबर लावून रांगेत थांबतो त्यामुळे त्याच्या वेळेचा अपव्यय होतो त्यामुळे छोटे मोठे वाद पण बँकेत सतत होत असतात. त्यामुळे अनेक ग्राहकांना व व्यापाऱ्यांना याचा त्रास होत आहे.

बँक मॅनेजर धीरज जींदे यांना विचारपूस केली असता ते म्हणाले बँकेतील एका कर्मचाऱ्यांचा अपघात झाला आहे त्यांच्या जागेवर दुसरा कर्मचारी वाढवण्यासाठी वरिष्ठांकडे मागणी केली आहे तो पर्यंत दोन कर्मचाऱ्यांवर हा अतिरिक्त भार आहे.

# माझी निवडणूक विकासाच्या मुद्द्यावर : काशिनाथ दाते

## शेतकरी आणि नागरिकांच्या प्रश्नांवर आवाज उठवणार...

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.०९ पारनेर (अहिल्यानगर) :** जवळा ता. पारनेर येथे महायुतीचे उमेदवार काशिनाथ दाते सर यांच्या गावभेट दौऱ्यात झालेल्या छोट्याशा सभेत दाते सर बोलत होते. पारनेर-नगरची जागा राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीला सुटल्यानंतर माझी उमेदवारी निश्चित होताच सर्वात प्रथम भारतीय जनता पार्टीची मदत मला झाली.

पारनेर तालुक्यातील भाजपाची संघटना अतिशय मजबूत असून भाजप नेत्यांनी माझ्या प्रचारालाच सुरुवात केली तर नगर तालुक्यातील प्रचारात मला प्रकर्षाने जाणवले माझ्या निवडणुकीच्या विजयात माझ्या महिला भगिनींचा सर्वात मोठा वाटा असणार आहे. यावेळी काशिनाथ दाते यांच्या समवेत भाजपाच्या प्रदेश कार्यकारणीचे सदस्य विश्वनाथ कोरडे, राष्ट्रवादीचे प्रथम जिल्हाध्यक्ष प्रशांत गायकवाड, राष्ट्रवादीचे नूतन जिल्हाध्यक्ष अशोक सावंत, भाजपचे तालुकाध्यक्ष राहुल पाटील शिंदे, सभापती गणेश शेळके, राष्ट्रवादीचे तालुकाध्यक्ष विक्रम कळमकर, सचिन पाटील वराळ, पंकज कारखिले, भाजपाच्या महिला तालुकाध्यक्षा सोनाली सालके, राष्ट्रवादीच्या महिला तालुकाध्यक्षा सुषमा रावडे, नवनाथ सालके, कृष्णाजी बडवे यांसह स्थानिक नागरिक मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.

काशीनाथ दाते यांनी उपस्थित शेतकरी आणि नागरिकांशी संवाद साधताना सांगितले की, आम्ही शेतकरी आणि नागरिकांच्या प्रश्नांवर आवाज उठवण्यासाठी नेहमी तयार आहोत. आमचा प्रचारदौरा या भागातील विकासासाठी आणि शेतकरी कल्याणासाठीच आहे. अजित दादांनी केलेली अतिशय लोकप्रिय घोषणा मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण या योजनेच्या लाभार्थी असलेल्या माझ्या लाडक्या बहिणी या योजनेवर अतिशय खुश आहेत.

महिलांच्या चेहऱ्यावर मला ते प्रकर्षाने जाणवत असून या सरकारने अनेक कल्याणकारी योजना राबवल्या आहेत. म्हणून हे सरकारला पुन्हा एकदा निवडून येणार आहे केंद्रात आणि राज्यात एकाच विचाराचे सरकार असल्यास राज्याचा सर्वांगीण विकास झाल्याशिवाय राहणार नाही. मी स्वभावाने शांत असलो तरी अन्यायाचा प्रतिकार केल्याशिवाय राहणार नाही. मी निवडणुकीला उभे राहू नये म्हणून अनेक अडथळे निर्माण केले माझ्यावर बालंट आणण्याचे प्रकार केले. खोटेनाटे आरोप माझ्यावर केले, माझा मनोधैर्य खचविण्याचेही प्रयत्न झाले. मला निवडणुकीतून बाजूला करण्याचा डाव रचला,

परंतु मला विश्वास आहे माझ्यावर कितीही आरोप केले तरी माझी पारनेरची जनता त्यावर विश्वास ठेवणार नाही. मी जाहीरपणे सांगतो कोणत्याही दमबाजीला घाबरू नका. आपण खंबीर व्हा, आमदार पदाचा वापर सर्वसाम न्याच्या हितासाठी सर्वसामान्यांची कामे करण्यासाठी करावा लागतो.

उमेदवारी जाहीर होताच पारनेर भाजपची संपूर्ण यंत्रणा सर्व शक्तीनिशी म हायुतीचे उमेदवार म्हणून काशिनाथ दाते यांच्या पाठीशी खंबीरपणे उभी राहिलेली असून सरांच्या विजयातच आपला सर्वांचा विजय सामावलेला असल्याने मतदान होईपर्यंत आपण सर्वांनी कुणाच्याही आणि कुठल्याही निमंत्रणाची वाट न पाहता आपणच उमेदवार आहोत हे मनाशी निश्चित करून काम करा. पुढील ११ दिवस प्रत्येकाने सरांसाठी द्या पुढील पाच वर्ष सर आपली सर्वांची काळजी घेतील.

**-- विश्वनाथ कोरडे**

महिला आणि महायुतीच एक भावनिक नात तयार झालेलं आहे. म तदारसंघातील प्रत्येक महिला महायुतीचे उमेदवार काशिनाथ दाते सर यांच्या पाठीशी कर्तव्य भावनेतून खंबीरपणे उभी असून ज्या दिवशी महायुतीचे उमेदवार या मतदारसंघात निवडून आल्याची अधिकृत घोषणा होईल त्या दिवशी बहिण भावाच्या नात्यात असलेल्या दृढ विश्वासाची प्रचीती येईल.

**-- सोनाली सालके, भाजप महिला तालुकाध्यक्ष**

## आठवडे बाजाराची संधी साधून मोखाड्यात प्रचाराचा धुराळा...

**अक्षराज : सौरभ कामडी**

**दि.०९, मोखाडा :** मोखाडा ता. विक्रमगड विधानसभा निवडणुकीच्या प्रचाराला रंग चढला आहे. गाव खेड्यापाड्यात वाहनांवर ध्वनिक्षेपकावरून प्रचाराची राळ ऊडवली जात आहे. गाव बैठका घेतल्या जात आहेत. त्यातच मोखाडा तालुक्यातील मुख्य बाजारपेठ असलेल्या खोडाळा गावात शनिवारी आठवडे बाजाराची संधी साधून सर्वच राजकीय पक्षांनी प्रचाराला धुराळा ऊडवला आहे. त्यामध्ये महाविकास आघाडी चे ऊमेदवार सुनिल भुसारांची रॅली लक्षवेधी ठरली आहे.

पालघर जिल्ह्यातील भौगोलिक दृष्ट्या विस्तीर्ण पसरलेल्या विक्रमगड विधानसभा क्षेत्रात, ऊम दवारांना मतदारांपर्यंत पोहोचण्याचे मोठे आव्हान आहे. सध्यस्थितीत खरीपाच्या कापणीचा हंगाम सुरू आहे.



त्यामुळे गाव, खेड्यापाड्यातील मतदार शेतीच्या काम ांत गुंतला आहे. ऊमेदवार आणि कार्यकर्ते प्रचारासाठी गावपाड्यांत जातात मात्र, सर्वच मतदारांची भेट होत नाही. त्यामुळे त्यांना विन्मुख होऊन माघारी परतावे लागते आहे.

गावपाड्यांतील नागरीक दररोज बाजारहाट करण्यासाठी येत नाही. ते आठवडा बाजाराच्या दिवशी जीवनावश्यक वस्तु खरेदी साठी येतात. मोखाडा तालुक्यात खोडाळा आणि मोखाडा या दोन मुख्य बाजारपेठा आहेत. त्यामध्ये खोडाळ्याचा आठवडे बाजार शनिवारी भरतो. याच दिवशी पंचक्रोशीतील सुमारे ४० ते ५० गावपाड्यांतील नागरीक बाजारहाट करण्यासाठी येतात.

आठवडे बाजाराची हीच नामी संधी साधून खोडाळा आठवडे बाजारात महाविकास आघाडी चे ऊमेदवार सुनिल भुसारांनी रॅली काढुन, मतदारांना मतदान करण्याचे आवाहन केले आहे. महायुतीच्या कार्यकर्त्यांनी वाहनावर ध्वनिक्षेपक लावुन प्रचाराचा धुराळा ऊडवला आहे. लाल बावटाच्या कार्यकर्त्यांनी चौकात ऊभे राहुन ध्वनिक्षेपकावरून प्रचार केला आहे. मात्र, आठवडे बाजारात महाविकास आघाडी चे ऊम दवार सुनिल भुसारांची रॅली लक्षवेधी ठरली आहे.

# अबुल कलाम म्हणजे वाचस्पती

मौलाना आझाद यांचा जन्म ११ नोव्हेंबर १८८८ रोजी सौदी अरेबिया या देशातील पवित्र भूमी मक्का येथे झाला. त्यांचे वडील मौलाना खैरुद्दीन हे धर्मगुरू होते. ही भूमी त्यांना न मानवल्याने ते आपल्या कुटुंबासह भारतात आले आणि त्यांनी कोलकाता शहरात वास्तव्य केले. मौलाना आझाद यांच्या मातोश्री मक्का येथील धर्मगुरूंच्या कुटुंबातील होत्या. आई आणि वडील या दोघांकडील घराणे उच्चशिक्षित होते. मुलाचे पाय पाळण्यात दिसतात या न्यायाने ते लहानपणापासूनच अतिशय हुशार होते. ते इस्लाम धर्माचे आधुनिक विचारवंत होते. आई आणि वडिलांची घराणी कट्टरपंथी असली तरी आझाद कट्टरपंथी नव्हते. त्यांनी इस्लामचा पवित्र धर्मग्रंथ कुराणाचा अभ्यास करून त्यावर तर्जुम नुल कुरान हे पुस्तकही लिहिले आहे. त्यांना अरबी, फारशी, इंग्रजी व उर्दू या भाषा चांगल्या अवगत होत्या व ते चारही भाषांतून लिखाण करीत असत. ते एक उत्कृष्ट वक्तेदेखील होते. त्यांचे भाषण ऐकण्यासाठी हजारोंच्या संख्येने लोक उपस्थित राहत असत. ते हिंदू-मुस्लिम ऐक्याचे प्रतीक होते. अनेक हिंदू विचारवंत त्यांचे चाहते होते. ते भारताच्या स्वातंत्र्यसंग्रामातील एक निष्ठावान शिपाई होते. फारसा गाजावाजा न करता कार्य करीत राहणे हे त्यांचे वैशिष्ट्य होते.

मौलाना अबुल कलाम हे भारताचे एक प्रमुख राजकीय पुढारी होते. त्यांचे मूळ नाव मोहिउद्दीन अहमद असे असून अबुल कलाम म्हणजे वाचस्पती ही त्यांची पदवी होती. पुढे आझाद (स्वतंत्र) हे टोपणनावही ते लावू लागले. वडिलांबरोबर सन १८९० साली ते कलकत्याला आले. पारंपरिक मुसलमानी शिक्षण पद्धतीप्रमाणे त्यांनी फार्सी, उर्दू व अरबी या भाषांचे प्रथम अध्ययन केले. नंतर त्यांनी तर्कशास्त्र, इस्लाम धर्म, तत्त्वज्ञान व गणित यांचा अभ्यास केला. पुढे सर सय्यद अहमदखान यांच्या लेखांचा परिणाम होऊन त्यांनी इंग्रजीचा अभ्यास स्वतंत्रपणे सुरू केला. इ.स.१९०८मध्ये ईजिप्त, अरबस्थान, तुर्कस्थान, फ्रान्स आदी देशांना त्यांनी भेटी दिल्या. तेथील



क्रांतिकारकांच्या संपर्कामुळे त्यांची राजकीय मते बदलू लागली आणि कलकत्त्यास परत येताच हिंदी मुसलम ानांनी स्वातंत्र्यसंग्रामात पुढाकार घ्यावा, असे मत त्यांनी प्रतिपादित केले. लोकजागृतीसाठी सन १९१२ साली कलकत्ता येथे त्यांनी अल्-हिलाल हे उर्दू साप्ताहिक सुरू केले. अनेक वृत्तपत्रांतून आझाद या टोपणनावाने ते लेखन करीत. अल्-हिलालमधील प्रखर राजकीय टीकेमुळे ब्रिटिश सरकारने त्यांच्याकडून दहा हजार रुपयांचा जामीन मागितला. आझादांनी तो दिला नाही, म्हणून ते वृत्तपत्र बंद पाडले. दोन वर्षांनी त्यांनी अल्-बलाघ हे दुसरे वृत्तपत्र काढले. त्यामुळे आझादांना अनेक प्रांतांत जाण्यास बंदी घालण्यात आली; पुढे त्यांना रांचीला स्थानबद्ध करण्यात आले. मुसलमानात त्यांच्या अटकेमुळे नवे वारे संचारले. इ.स.१९२० साली त्यांची सुटका झाली.

भारताच्या स्वातंत्र्यसंग्रामात भाग घेतला नसता तर त्यांनी गुरू-शिष्य परंपरेत म्हणजेच पीर-मुरीदी परंपरेत खूप चांगले कार्य केले असते. त्यांच्या गळ्यात असणाऱ्या स्वरगंगेत लोक न्हाऊन निघत असत. परंतु संगीत क्षेत्रातही न रमता गांधीजी, पंडित जवाहरलाल नेहरू, डॉ.राजेंद्रप्रसाद, ॲनी बेझंट, लालबहादूर शास्त्री, वल्लभभाई पटेल यांच्यासमवेत भारतीय स्वातंत्र्यलढ्यात त्यांनी उडी घेतली. सुरुवातीला ते सर सय्यद यांच्या विचारांनी भारावलेले होते. परंतु सर सय्यद यांनी इंग्रजांशी मैत्री केल्यामुळे प्रखर राष्ट्रवादी असलेल्या मौलाना आझाद यांनी त्यांच्याशी नाते तोडले. भारत हा आपला देश आहे. त्यावर परकीयांचा ताबा ही दडपशाही आहे, अशी त्यांची भूमिका होती. भारतावर स्वकीयांचीच सत्ता हवी, असे त्यांचे मत होते. कष्ट आणि निष्ठा यावर त्यांची नितांत श्रद्धा होती. शेवटपर्यंत त्यांनी या विचारांवरच वाटचाल केली. इंग्रजांनी १८५७मध्ये संपूर्ण भारतावर ताबा मिळवला. त्याच लढाईत भाग घेणाऱ्या मुस्लिम घराण्यांमधील लोकांची इंग्रजांनी कत्तल केली व त्यांच्यावर अत्याचार केले. काही जणांना काळ्या पाण्याची शिक्षा दिली तर अनेकांना दिल्लीच्या रस्त्यावर फाशी दिली. यात मुसलमानांची संख्या अधिक होती. कारण इंग्रजांची अशी भूमिका होती की, मुसलमान हे या देशाचे राजे होते. त्या वेळी भारतीय मुसलमानांच्या मनात मोठ्या प्रमाणावर नैराश्य पसरले. पूर्वी बाप वा राजा या भूमिकेत वावरणारे मुसलमान इंग्रजांनी सत्ता बळकावल्यामुळे दुखावले गेले होते. त्यानंतर पन्नास-साठ वर्षांपर्यंत कोणीही मुलसमान इंग्रजांसमोर येण्यास तयार नव्हते. सर सय्यद यांच्यासारखे बुद्धिवंत इंग्रजांशी हात मिळवून त्यांच्या बाजूने बोलत असत. अशा वेळी त्यांनी भारताच्या स्वातंत्र्यलढ्यात एका निष्ठावान राष्ट्रवादी मुसलमानाची भूमिका बजावली. मौलाना आझाद देशाची अखंडता अबाधित राखण्यासाठी अहोरात्र झटत होते. गांधीजींशी चर्चा केल्यानंतर त्यांनी देशाचे विभाजन स्वीकारले, पण जे मुसलमान भारत सोडून पाकिस्तानला स्थलांतरित होत होते, त्यांना त्यांनी विरोध केला होता. ते हिंदू-मुस्लिम ऐक्याचे सच्चे प्रतीक होते.

सन १९४७मध्ये भारताला स्वातंत्र्य मिळाले. पं.जवाहरलाल नेहरूंनी मौलानांकडे शिक्षण मंत्रालयाचे काम सोपवले व ते स्वतंत्र भारताचे पहिले शिक्षणमंत्री झाले. त्यांनी त्या काळी अत्यंत बिकट परिस्थितीतही भारतात शिक्षणाचा प्रसार व प्रचार उत्तम प्रकारे राबवला. त्यांना युरोपच्या तत्कालीन समस्यांचे चांगले ज्ञान होते. जर्मन आणि इटलीच्या सत्ताधाऱ्यांची दडपशाही संपूर्ण जगासाठी मोठा धोका ठरणार आहे, असे ते सांगत. हिटलरच्या काळात अल्पसंख्याक व बुद्धिजीवींची सर्रास कत्तल होईल, हे मौलानांनी सांगितले होते आणि तसेच घडले. हे जगाने पाहिले व अनुभवलेही. हाऊस ऑफ लार्ड्सचे सदस्य लॉर्ड बटमली, ज्यांनी जवळपास ६० वर्षे इंग्लंड व भारताच्या राजकारणात भाग घेतला, ते मौलानांबद्दल म्हणतात, मौलाना आझाद विशाल मनाचे व्यक्ती होते. त्यांनी भारताच्या स्वातंत्र्य व अखंडतेसाठी कायम प्रयत्नांची पराकाष्ठा केली. स्वातंत्र्यलढ्यात त्यांची भूमिका खूप मोलाची ठरली. त्यांना युरोपियन साहित्याचेही चांगले ज्ञान होते. महाकवी बायरन आणि फ्रान्सच्या कादंबरीकारांची त्यांना चांगली माहिती होती. दि.२३ फेब्रुवारी १९५८ रोजी दिल्लीत मौलाना अबुल कलाम आझाद यांचे निधन झाले.

मौलाना आझाद प्रभावी वक्ते होते. त्यांचे इंग्रजी, उर्दू, अरबी व फार्सी भाषांवर चांगले प्रभुत्व होते; त्यांनी अनेक वृत्तपत्रांतून स्फुट लेखन केले आणि उर्दूत काही पुस्तके लिहिली आहेत. त्यांतील तजकेरा, गुब्बारे खातिर, कौले फैसल, दास्ताने करबला, तरजुमानुल कोरान ही पुस्तके प्रसिद्ध आहेत. तरजुमानुल कोरान म्हणजे कुराणाचा सटीप उर्दू अनुवाद असून तो फार लोकप्रिय आहे. याशिवाय त्यांचे इंडिया विन्स फ्रीडम हे आत्मचरित्र त्यांच्या मृत्यूनंतर प्रसिद्ध झाले आहे. केंद्र सरकारने इ.स.१९९२मध्ये त्यांना मरणोत्तर भारतरत्न किताब प्रदान केले.

**!! राष्ट्रीय शिक्षण दिन व जयंती निमित्त त्यांना सप्ताहभर विनम्र अभिवादन !!**

**श्री.कृष्णकुमार गोविंदा निकोडे गुरुजी.**
**पो. ता. जि. गडचिरोली.**
**भ्रमणध्वनी – ९४२३७१४८८३.**

# विवाहित सैनिकाचा तरुणीवर जडला जीव; पत्नी अडथळा ठरत असल्याने थेट नदीत

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.०९, नागपूर :** भारतीय सैन्यात जम्मू-काश्मीरमध्ये तैनात असलेल्या जवानाने महाविद्यालयात सोबत शिकणाऱ्या प्रेयसीसोबत प्रेमविवाह केला. दोन वर्षे संसार सुरळीत सुरू होता. मात्र, अचानक त्या जवानाच्या जीवनात दुसरी तरुणी आली. त्याने तिच्याशी लग्न करण्यासाठी पत्नीकडे घटस्फोटाचा तगादा लावला. पत्नीने घटस्फोट न दिल्यामुळे अन्य तीन साथिदारांच्या मदतीने त्याने पत्नीचा खून करुन पत्नीला नग्नावस्थेत नदीत फेकले. ही घटना रामटेकमध्ये उघडकीस आली. या प्रकरणी रामटेक पोलिसांनी दोघांना अटक केली तर सैन्यात कार्यरत दोघांना अटक करण्यासाठी पथक रवाना केले. भारती ऊर्फ यशोदा सचिन घरात (२२, बोर्डा) असे मृत तरुणीचे नाव आहे.




पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, भारती ही पदवीचे शिक्षण घेत होती. त्याच महाविद्यालयात सचिन घरात (२६, रा.डोंगरताल, ता.रामटेक) हा शिकत होता. भारतीला बघताच सचिन तिच्या प्रेमात पडला. त्याने एका मैत्रिणीच्या माध्यमातून भारतीचा मोबाईल नंबर मिळवला. तिची ओळख करुन घेतली. दोघांची काही दिवसांतच घट्ट मैत्री झाली. दोघांचे प्रेमसंबंध निर्माण झाले.

दोघांनीही प्रेमविवाह करण्याचा निर्णय घेतला. पदवी पूर्ण होताच सचिनची निवड भारतीय सैन्य दलात झाली. त्यामुळे त्यांच्या प्रेमविवाहाला दोन्ही कुटुंबीयांनी सहमती दर्शविली. २०२२ मध्ये दोघांनी मोठ्या थाटात प्रेम विवाह केला. दोन वर्षे संसार व्यवस्थित सुरू होता.

**खून करण्याचा कट रचला**

भारतीच्या मैत्रिणीशी सचिनची ओळख झाली. विवाहित असतानाही त्याने तिच्याशी प्रेमसंबंध प्रस्थापित केले. तीसुद्धा त्याच्या प्रेमात पडली. दोघांनीही लग्न करण्याचा निर्णय घेतला. मात्र, आता पत्नी भारती दोघांमध्ये काटा होती.

त्यामुळे पत्नीला रस्त्यावरुन हटविल्याशिवाय लग्न होणार नव्हते. त्यामुळे त्याने साथिदार भूनेश्वर गजबे (१९), राहुल चौके (२२) आणि सैन्य दलातील सहकारी नरेंद्र दोडके यांची मदत घेतली व भारतीचा खून करण्याचा कट रचला.

**असा केला पत्नीचा खून**

घटस्फोट देण्यास नकार देणाऱ्या भारतीला फिरायला नेण्याच्या बहाण्याने कारमध्ये सोबत घेतले. कारमध्ये आधीच भूनेश्वर गजबे, राहुल चौके आणि नरेंद्र दोडके हे तिघे होते. सचिनने पत्नाचा गळा आवळून खून केला. भारतीच्या अंगावरील कपडे काढले. तिचा नग्नावस्थेतील मृतदेह मध्यप्रदेशातील बेडाघाट परिसरातून वाहणाऱ्या नर्मदा नदीत फेकून पळ काढला.

**असे आले हत्याकांड उघडकीस...**

भारती बेपत्ता असल्याची तक्रार आई निर्मला नारनवरे यांनी दिली. ठाणेदार आसाराम शेटे यांनी भारतीच्या मोबाईलचा तांत्रिक तपास केला असता भूनेश्वरची माहिती समोर आली. त्याला ताब्यात घेऊन खाक्या दाखवताच त्याने भारतीचा खून केल्याची कबुली दिली. लगेच दुसरा आरोपी राहुल चौके याला अटक केली. त्याने मृतदेह नदीत

फेकल्याचे सांगितले. पोलिसांनी नदीतून मृतदेह बाहेर काढून ओळख पटवली. सैन्य दलात असलेला पती सचिन घरात आणि नरेंद्र दोडके यांना अटक करण्यासाठी पथक रवाना केले.

# उत्सव निवडणुकीचा, अभिमान महाराष्ट्राचा या स्वीप मतदार जागृती उपक्रमांचा शुभारंभ

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.०९, बुलडाणा :** विधानसभा सार्वत्रिक निवडणुकीच्या अनुषंगाने दि.०९ रोजी 'उत्सव निवडणुकीचा, अभिमान महाराष्ट्राचा' या स्वीप मतदार जागृती उपक्रमांचा राज्यस्तरीय शुभारंभ मुंबईतील गेटवे ऑफ इंडिया येथून करण्यात आला. या कार्यक्रमाचे थेटप्रक्षेपण करण्यात आले असून या प्रक्षेपण कार्यक्रमाचे आयोजन जिल्हाधिकारी कार्यालयात करण्यात आले.




या कार्यक्रमाला जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी डॉ. किरण पाटील, निवडणूक निरीक्षक स्मिता सभरवाल, जिल्हा परिषदेचे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी बी.एम. मोहन, अपर जिल्हाधिकारी सदाशिव शेलार, उपजिल्हा निवडणूक अधिकारी सुहासिनी गोणेवार आदी अधिकारी उपस्थित होते.

यावेळी निवडणूक निर्णय अधिकारी, नोडल अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय व जिल्हा परिषदेचे अधिकारी व कर्मचारी यांनी 'मतदान शपथ' घेतली.

**२० नोव्हेंबर रोजी आवर्जून मतदान करा - जिल्हाधिकारी**

या कार्यक्रमात स्वीप उपक्रमांतर्गत मतदारांना मतदानासाठी प्रोत्साहित करण्यासाठी जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी डॉ. किरण पाटील यांच्या 'लोकशाहीचा उत्सव साजरा करुया, चला मतदानाचा संकल्प करुया' या मतदार जनजागृती ध्वनीचित्रफित संदेशाचे प्रकाशन करण्यात आले.

तसेच लोकशाहीचा उत्सव असलेल्या महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीत मतदारांनी मतदान करून आपला अधिकार बजवावा व कर्तव्य पार पाडावे. येत्या २० नोव्हेंबर रोजी आवर्जून मतदान करावे, असे आवाहन जिल्हाधिकारी डॉ. पाटील यांनी यावेळी केले.

# शेतकऱ्यांनो खरेदी केंद्रावर जावून नोंदणी करा : जिल्हा पणन अधिकारी यांचे आवाहन

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.०९, धाराशिव :** खरीप हंगाम २०२४-२५ मध्ये जिल्हयात आधारभूत किंमत खरेदी योजनेअंतर्गत नाफेडमार्फत तालुकानिहाय १७ केंद्रावर मुग,उडीद व सोयाबीन या पिकाची ऑनलाईन शेतकरी नोंदणीस १ ऑक्टोबरपासून सुरूवात झाली आहे.शेतकऱ्यांनी आपल्या जवळच्या खरेदी केंद्रावर स्वत : जावून ऑनलाईन नोंदणी करावी.असे आवाहन जिल्हा पणन अधिकारी यांनी केले आहे.

शेतकऱ्यांनी पिकांच्या नोंदणीसाठी आपले आधार कार्ड,राष्ट्रीयकृत बँकेचे छापील पासबुक (अकाउंट नंबर व आय.एफ.एस.सी.कोड स्पष्ट दिसावा), ऑनलाईन पीक पेरा असलेला ७/१२ उतारा घेवून पिकाची नोंदणी करावी.

शासनाकडून मुंग, उडीद, सोयाबीन या पिकांसाठी नोंदणी कालावधी निश्चित करण्यात आला आहे.यामध्ये मुंग आणि उडीद या पिकासाठी १ ऑक्टोबरपासून सुरुवात झाली आहे. तर त्यांचा खरेदी कालावधी हा १० ऑक्टोबर २०२४ पासून ७ जानेवारी २०२५ पर्यंत असणार आहे. तर सोयाबीन पिकासाठी १५ ऑक्टोबर २०२४ पासून खरेदीस सुरुवात झाली आहे.ही खरेदी १२ जानेवारी २०२५ पर्यंत नाफेडकडून करण्यात येणार आहे.

मुग,उडीद,सोयाबीन या पिकांच्या आधारभूत किंमतीही निश्चित करण्यात आल्या आहेत.यामध्ये मुग पिकासाठी ८ हजार ६८२ रूपये प्रति क्विंटल,उडीद पिक ७ हजार ४०० रूपये प्रति क्विंटल, सोयाबीन ४ हजार ८९२ रूपये प्रति क्विंटल दराने निश्चित करण्यात आला आहे.

याबरोबरच तालुकानिहाय खरेदी केंद्र आणि सबएजंट संस्थेची नेमणूकही करण्यात आली आहे. धाराशिव जिल्ह्यातील धाराशिव तालुका शेतकरी सह संघ लि.,धाराशिव, विकास कृषी पणन सहकारी संस्था मर्या उस्मानाबाद,वसुधरा जिल्हा कृषी पणन व प्रक्रीया सह.संस्था कनगरा,वसुंधरा अँग्रीकल्चर फार्मर्स प्रोड्युसर कंपनी लि.कनगरा, तुळजापूर तालुक्यातील तुळजापूर तालुका शेतकी सहकारी खरेदी विक्री संघ,ता.तुळजापूर,श्री.खंडोबा पणन सहकारी संस्था मर्या अणदूर,लोहारा तालुक्यातील जगदंबा सहकारी खरेदी विक्री संस्था लोहारा, दस्तापूर विविध सर्व सेवा सहकारी सोसायटी मर्या दस्तापूर, उमरगा तालुक्यातील गुंजोटी विविध कार्यकारी सेवा सोसायटी लि गुंजोटी,श्री.स्वामी समर्थ सर्व सेवा सहकारी संस्था मर्या. गुंजोटी,कळंब तालुक्यातील एकत खरेदी विक्री सहकारी संस्था मर्या.धाराशिव,तालुका सह.शेतकरी खरेदी विक्री संघ लि.कळंब, राजमाता कृषी पुरक सेवा पुरवठा सहकारी संस्था,चोराखळी, वाशी तालुक्यातील वाशी तालुका शेतकरी सह संघ लि.वाशी तर भुम तालुक्यातील शिवाजी भुम तालुका शेतकरी सह.खरेदी विक्री संघ लि., तनुजा महिला शेतीपूरक सेवा पुरवठा सह संस्था सोन्नेवाडी भूम,कै. उत्तमराव सोन्ने कृषीमाल पुरक सह . संस्था सोन्नेवाडी या केंद्रावर आपले वरील पिके विकता येणार आहेत.

शेतकऱ्यांनी शासनमान्य हमीभाव खरेदी केंद्रावर सोयाबीन शेतमाल घेवून येतांना व्यवस्थितरित्या वाळवून आणावा. जेणेकरून आर्द्रता मोजतांना १२ टक्यापेक्षा कमी असणे आवश्यक आहे.जास्त आर्द्रतेमुळे शेतमाल परत नेण्याची वेळ येणार नाही.असेही आवाहन जिल्हा पणन अधिकारी एम.व्ही.बाजपेयी यांनी केले आहे.

# ठाणे जिल्ह्यात गृहमतदानाला सुरुवात

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.०९, ठाणे :** अपंग आणि ८५ वर्षांवरील नागरिकांना मतदानाचा हक्क बजावता यावा यासाठी भारत निवडणूक आयोगामार्फत गृह मतदानाची सुविधा उपलब्ध करण्यात आली आहे. याच पार्श्वभूमीवर आजपासून ठाणे जिल्ह्यात गृहमतदानाला सुरुवात झाली आहे. जिल्हा निवडणूक विभागाचे अधिकारी आणि कर्मचारी गृहमतदानासाठी नोंदणी केलेल्या नागरिकांच्या निवासस्थानी जाऊन त्यांचे मत नोंदवून घेत आहेत. जिल्ह्यात सुमारे ९३३ नागरिकांनी गृह मतदानासाठी निवडणूक आयोगाकडे अर्ज केले असून त्यांच्यासाठीची निवडून प्रक्रिया राबविण्यास सुरुवात झाली आहे.

सार्वत्रिक निवडणुकांमध्ये मतदारांचा उत्स्फूर्त असा प्रतिसाद मिळावा यासाठी निवडणूक विभागाच्या माध्यमातून विविध जनजागृतीच्या उपायोजना राबविण्यात येत असतात. तसेच ज्येष्ठ नागरिक, अपंग नागरिक यांच्यासाठी मतदानाच्या विशेष सुविधा उपलब्ध करून देण्यात येतात. याच पार्श्वभूमीवर जिल्ह्यातील अपंग आणि ८५ वर्षांवरील नागरिकांना मतदानाचा हक्क बजावता यावा यासाठी भारत निवडणूक आयोगामार्फत गृह मतदानाची सुविधा उपलब्ध करण्यात आली आहे. लोकसभा निवडणुकीच्या दरम्यान ही गृहमतदानाला उत्तम प्रतिसाद मिळाला होता. जिल्ह्यात अपंग आणि ८५ वर्षांवरील नागरिक असे ९५ हजार



१२५ मतदार आहेत. यापैकी जिल्ह्यात सुमारे ९३३ नागरिकांनी गृह मतदानासाठी निवडणूक आयोगाकडे अर्ज केले होते. या अर्ज केलेल्या नागरिकांसाठी घरातून मतदान करण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. या नागरिकांसाठीचे जिल्ह्यात आजपासून मतदान सुरु झाले आहे. प्रत्येक विधानसभा मतदारसंघासाठी दिवस ठरवून देण्यात आला असून त्यानुसार मतदारांच्या घरी जाऊन मतदान नोंदवून घेतले जात आहे. यासाठी जिल्हा निवडणूक विभागाचे पथक नागरिकांच्या घरी जाऊन मतदान नोंदवून घेत आहे.

# थोडक्यात

## अंजनवेल जि.प.गटात मनसेला जोरदार पाठिंबा



**अक्षराज : उदय दणदणे**

**दि.०९, गुहागर :** २६४ गुहागर विधानसभा मतदारसंघातील जिल्हा परिषद अंजनवेल गटामध्ये मनसेचा जोरदार प्रचार, सुरू असून मोठ्या प्रमाणात ग्रामस्थांचा महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अधिकृत उमेदवार प्रमोद गांधी यांना पाठींबा मिळत आहे.

## तलासरी इस्कॉन मंदिरात गोपाष्टमी उत्सव संपन्न

**अक्षराज : हरी कापसे**

**दि.०९, तलासरी (पालघर) :** आंतरराष्ट्रीय श्रीकृष्ण भावना मृत संघ इस्कॉन हरे कृष्ण मंदिर (निलचाल वैदिक व्हिलेज) पाटिलपाडा तलासरी येथील मंदिरात दरवर्षी प्रमाणे यंदा ही गोपाष्टमी अत्यंत हर्षोउल्हास आनंद व मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. यावेळी या गोपाष्टमी महोत्सव साजरी करिता मुंबई, वाडा, बोईसर, वापी, सेलवास, दमण येथून व तलासरी स्थानिक अनेक भक्तगण उपस्थित होते. या कार्यक्रमात आजच्या दिनी गाईंना स्नान वस्त्र, आभूषणाने सजवून चारा केळी,लाडू,विशेष भोजन करवून सेवा सन्मान सहित दामोदर दुलाल दास प्रभुजी आणि पुजारी व्दारे पूजन आरती कीर्तन करण्यात आले.त्यानंतर मंदिराचे व्यवस्थापक राधिका कन्हेया प्रभुजी व रघुपती प्रभुजी, पवन दास प्रभुजी, चैतन्य जीवन प्रभू, मुकुंद पद्मा प्रभुजी ओमकार प्रभुजी यांनी राधारास बिहारी गौशाळेत विधिव्रत यग्न करण्यात आले. त्यानंतर गौमाता विषयी वैदिक सनातन कथा कथन केली. या कथेत व्दापार युगातील आजच्या पवित्र पावन दिनी नंद महाराज यांनी भगवंत बाल श्रीकृष्ण यांना पहिल्यांदा गाईंना वनात चारण्याकरिता अधिकार उत्तरदायित्व दिले होते. असे याकथेत भगवंत श्रीकृष्णच्या लीला व गाई विषयी उपस्थित भक्तांना कथन करण्यात आले. त्यानंतर कीर्तन करीत सर्वांना भोजन प्रसाद देण्यात आला. आजचा गोपाष्टमी उत्सव पूर्ण झाला.

## महायुतीचे उमेदवार शिवाजीराव कर्डिले यांचा फ्लेक्स बोर्ड फाडला

**अक्षराज : सत्यम भोसले**

**दि.०९, राहुरी (अहमदनगर) :** बोर्ड फाडले तरी आता राहुरी विधानसभा मतदारसंघातील जनतेने भाजपा महायुतीचे उमेदवार शिवाजीराव कर्डिले यांना निवडून देण्याचा निर्णय घेतलेला आहे. त्यामूळे जनमत बदलणार नाही, विरोधकांनी पातळी सोडू नये. असा इशारा भाजपा विधानसभा मतदार संघाचे संयोजक अमोल भनगडे यांनी दिला आहे. राहुरी विधानसभा मतदार संघाचे भाजपा महायुतीचे उमेदवार शिवाजीराव कर्डिले यांच्या प्रचाराचा सोनगाव सात्रळ परीसरात फ्लेक्स बोर्ड अज्ञातांनी फाडला या घटनेचा निषेध व्यक्त करताना संयोजक अमोल भनगडे यांनी सांगितले की, राहुरी विधानसभा मतदार संघांमध्ये शिवाजीराव कर्डिले यांना सर्वसामान्य जनतेचा व मतदारांचा मोठ्या प्रमाणात पाठिंबा मिळत असून सर्वसामान्य जनतेमध्ये यांनाच निवडून देण्याचे मत तयार झालेले आहे.




त्यामुळे काही अज्ञात विरोधक यांना हे सहन होत नसल्याने अशा प्रकारे पातळी सोडून फ्लेक्स बोर्ड फाडण्याचा प्रकार सुरू झाला आहे. लोकशाही प्रक्रियेमध्ये सर्व उमेदवारांना प्रचार करणेचा अधिकार आहे, परंतु संबंधित अज्ञातांची पायाखालची जमीन घसरल्याने असे प्रकार सुरू झाले आहेत. परंतु असे बोर्ड फाडले तरी आता जनमत बदलणार नाही. संबंधित घटनेचा आम्ही तीव्र शब्दात निषेध व्यक्त करत असून संबंधितावर कारवाई करावी. अशी आमची मागणी आहे, असे अमोल भनगडे यांनी सांगितले.

## दिव्यात मनसेच्या मुख्य प्रचार कार्यालयाचे उद्घाटन राजू पाटील यांच्या हस्ते संपन्न

**अक्षराज : विनोद वास्कर**

**दि.०९, दिवा (ठाणे) :** दिवा शहरात रेल्वे स्टेशनच्या बाजूलाच महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे मुख्य प्रचार कार्यालयाचे उदघाटन आमदार राजू पाटील यांच्या हस्ते मोठ्या थाटामाटात करण्यात आले. नवीन प्रचार गीत सादर करण्यात आले.




चोहिकडून महाराष्ट्र नवनिर्मान सेनेचा आवाज ऐकू येत होता. या ठिकाणी पुन्हा एकदा राजू दादा अशा समर्थकांच्या घोषणा ऐकायला येत होत्या. येत्या दिवसात राजू दादा मंत्री सुद्धा असतील अशा भावना पदाधिकाऱ्यांनी व्यक्त केल्या. याप्रसंगी महिला आणि तरुणांनी मनसेत मोठ्या संख्येने प्रवेश केला.

दिवसेंदिवस मोठ्या संख्येने तरुण महिला मनसेत प्रवेश करत आहेत. कार्यालय आता लहान पडू लागली आहेत. असे दिवा शहर अध्यक्ष तुषार पाटील म्हणाले.